Mahajan sir - 82

# नगर परिषद कार्यालय मोर्शी

## जिल्हा अमरावती

mcmorshi@gmail.com
दुरध्वणी क्रमांक. - 0722822249

मोनप/वियो/सनर/नअ/2208/२०२० | दि. 23 / 01 / २०२०

## पुर्णत्व प्रमाणपत्र

अर्जदार - १. आरीफ हारुन कासमानी

२. इकबाल हारुन कासमानी

३. हमीदा उर्फ राबुबाई हारुन कासमानी

४. हारुन अली महमद कासमानी

रा. वर्धा ता. वर्धा

प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार यांना मोनप/वियो/सनर/न अ/२६/२०१९ दि. २४.१२.२०१९ अन्वये मौजा येरला शे.स.नं. १७३/२ब साठी अभिन्यासास अंतीम मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर अभिन्यासात अर्जदाराने रस्ते, पाण्याची व्यवस्था, नाली, ओपन स्पेसला भिंतीचे कुंपण, विजेचे खांब व पथदिव्यांची व्यवस्था हि विकासकामे पुर्ण केलेली आहेत.

करीता सदर विकासकामांचे पुर्णत्व प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

नगर पालिका कार्यालय नपाम. मोर्शी.

मुख्याधिकारी,
नगर परिषद मोर्शी

Mhajan sir - 43

# नगर परिषद कार्यालय मोर्शी
## जिल्हा अमरावती

mcmorshi@gmail.com दुरध्वणी क्रमांक . - 0722822249

| मोनप/वियो/सनर/नअ/२६ /२०१९ | दि. २४/ १२ / २०१९ |
|---|---|

अर्जदार :- १. आरीफ हारुन कासमानी
२. इकबाल हारुन कासमानी
३. हमीदा उर्फ रा़बुबाई हारुन कासमानी
४. हारुन अली महमद कासमानी
रा. वर्धा ता. जि. वर्धा

## आदेश
(पारीत दिनांक२४ /१२/२०१९)

अर्जदार इकबाल हारुन कासमानी व इतर-३ रा. वर्धा त्यांचे मालकीचे मौजा येराल ता. मोर्शी जि. अमरावती येथे शेत जमीन भूमापन क्र. १७३/२ब मधील १:६३ हे.आर क्षेत्रफळ पैकी १.२३ हे.आर भोगवटदार वर्ग १ या कृषीक जमीनीचे निवासी प्रयोजनार्थ अकृषक वापरास परवानगी मिळावी विनंती अर्ज दाखल केल्यावरुन प्रकरण सुरु करण्यात आले.

सदर प्रकरणामध्ये अर्जदार यांनी अर्ज सहीत गाव नमूना, ७/१२, फेरफार, मोजणी शिट व प्रास्ताविक अभिन्यासाच्या प्रती सादर केल्या प्रकरणातील ७/१२ उतारा व फेरफार पत्रकाची तपासणी केली असता, प्रश्नाधिन शेतावर अर्जदार यांची मालकी व ताबा असल्याचे दिसते. प्रकरणामध्ये अर्जदार यांनी दिनांक ०८.०५.२०१८ या दिनांकाला अर्ज सादर केला होता.

सदर भुखंड न.प. हद्दीतील निवासी प्रयोजनासाठी आहे. सदर अभिन्यायाची प्रत ती पुन्हा सहाय्यक संचालक नगर रचना विभाग, अमरावती यांना दिनांक २३.०८.२०१८ रोजी अभिप्रायासाठी पाठविले नंतर त्यांनी जा.क्र. अकृषक/मौ. मोर्शी/ता. मोर्शी/स.नं. १७३/२ब/ससंनर-अम ४६१ दिनांक ०८.०३.२०१९ अन्वये अभिन्यासाच्या रेखांकनास मंजुरी प्रदान केलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अंतर्गत आणि महाराष्ट्र नगर परिषद व नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ नुसार आपण दिनांक ०८.०५.२०१८ रोजी नगर परिषद मोर्शी अर्ज सादर करुन मौजे येरला ता. मोर्शी जि. अमरावती येथील आपले मालकीचे जमीनचे प्लॉटसिटी सर्व्हे नंबर १७३/२ब ज्याचे क्षेत्रफळ १२३०.०० चौ. मी. आहे. त्यांचे उपविभाजन व निवासी परियोजना वापरण्यास करण्यास मंजुरी मागीतली आहे. आपण सादर केलेल्या दस्तऐवजाचे आधारी आपले शेत स्व मालकीचे आहे. जमिनीचे तयार केलेले अभिन्यास व त्यांचे उप विभाजन करण्यास खालील नमूद अटिस व शर्तीस आधिन राहुन मंजुरी देण्यात येत आहे.

नगर पालिका कार्यालय नपाम. मोर्शी.

जमिनीचे तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | लेआऊटचे एकुण क्षेत्रफळ | १२३००.०० चौ.मी. |
| २ | लेआऊट मधील निवासी प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ | ८१६९.८८ चौ.मी. |
| ३ | लेआऊट मधील खुले जागेचे क्षेत्रफळ | १२३०.०० चौ.मी. |
| ४ | लेआऊट मधील रोडखाली जमीनीचे क्षेत्रफळ | २९००.१२ चौ.मी. |

Mhajan sir - 44

परिशिष्ट अ मौजे येरला येथील भूमापन क्र. १७३/२ब मधील एकुण क्षेत्रफळ १.२३ हे.आर. जमीनीमध्ये अभिन्यास प्रमाणे पाडण्यात आलेले भुखंड खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्लॉट क्र. | प्रत्यक्ष प्लॉट चे क्षेत्रफळ (चौ.मी) | वळणा खालील क्षेत्र (चौ.मी.) | एकुण प्लॉट | एकुण प्लॉटचे क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | २५५.६० | - | १ | २५५.६० |
| २ | २,३,४ | २५२.०० | - | ३ | ७५६.०० |
| ३ | ५ | २७०.०० | १०.८८ | १ | २५९.१२ |
| ४ | ६ | २९०.०० | १०.८८ | १ | २७९.१२ |
| ५ | ७ | २५०.०० | - | १ | २५०.०० |
| ६ | ८ | २५६.५० | - | १ | २५६.५० |
| ७ | ९ | ९१.९७ | - | १ | ९१.९७ |
| ८ | १० ते १४ | ७१.५० | - | ५ | ३५७.५० |
| ९ | १५ | ८५.८० | ४.३५ | १ | ८१.४५ |
| १० | १६ | १४२.५० | ४.३५ | १ | १३८.१५ |
| ११ | १७ | १२७.५० | - | १ | १२७.५० |
| १२ | १८ | ११२.५० | - | १ | ११२.५० |
| १३ | १९ ते २४ | ९०.०० | - | ६ | ५४०.०० |
| १४ | २५ | १२३.७५ | - | १ | १२३.७५ |
| १५ | २६ | १४४.७५ | - | १ | १४४.७५ |
| १६ | २७,५२ | ९७.५० | - | २ | १९५.०० |
| १७ | २८ ते ३३ | ९०.०० | - | ६ | ५४०.०० |
| १८ | ३४,४५ | १०१.२५ | - | २ | २०२.५० |
| १९ | ३५ | १३१.२५ | ४.३५ | १ | १२६.९० |
| २० | ३६ | १२७.८७ | ४.३५ | १ | १२३.५२ |
| २१ | ३७ ते ४२ | ९३.०० | - | ६ | ५५८.०० |
| २२ | ४३ | १२२.८३ | - | १ | १२२.८३ |
| २३ | ४४ | १३१.२५ | ४.३५ | १ | १२६.९० |
| २४ | ४६ ते ५१ | ९०.०० | - | ६ | ५४०.०० |
| २५ | ५३ | १२५.२५ | - | १ | १२५.२५ |
| २६ | ५४ | ११४.०० | ४.३५ | १ | १०९.६५ |
| २७ | ५५ ते ५९ | ८२.५० | - | ५ | ४१२.५० |
| २८ | ६० | १११.०० | - | १ | १११.०० |
| २९ | ६१ | १७१.०० | - | १ | १७१.०० |
| ३० | ६२ | १५७.६० | - | १ | १५७.६० |
| ३१ | ६३ | १२२.६२ | ४.३५ | १ | ११८.२७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | ६४ ते ६७ | ९०.०० | - | ४ | ३६०.०० |
| ३३ | ६८ | १२०.०० | ४.३५ | १ | ११५.६५ |
| ३४ | ६९ | १७९.४९ | - | १ | १७९.४० |
| | | | | ६९ | ८१६९.८८ |

सदरील अभिन्यासाचा रेखांकन मोजणीची शिट मा. उपअधीक्षक भुमी अभिलेख जा.क्र. १५०१ दिनांक ३१.०५.२०१९ अन्वये सादर करण्यात आलेली आहे.

सदर अभिन्यायास विकसित करण्यासाठी तात्पुरती मंजुरी दि. ०९.०७.२०१९ रोजी देण्यात आली होती. सार्वजनिक वापरासाठी प्रस्तावित खुली जागा दिनांक २४.१२.२०१९ रोजी नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत.

जमीन निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्याची परवानगी खालील अटी व शर्तीवर देत आहे.

१. सदर जमीनीला ज्या कारणाकरीता अकृषक करण्याची परवानगी दिली आहे, त्याचे प्रयोजनाकरीता वापरण्यास बंधनकारक राहिल व उक्त वापरास या कार्यालयाचे परवानगी शिवाय जमीनीवरील बांधकामाचा उपयोग इतर दुसऱ्या प्रयोजनार्थ करणार नाही.
२. प्रस्तावित भुखंडाचे भविष्यात या कार्यालयाचे पूर्ण परवानगी शिवाय विभाजन करणार नाही.
३. आवेदक आदेश व सनद यातील सर्व अटींचे पालन करुन भुखंड विक्री करेल, अथवा सदर अटींचे पालन न करता भुखंड विक्री केल्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहिल. अर्जदार, (वैयक्तिक खरेदीदार) बांधकाम स्वरुप करण्यास पुर्वी बांधकामाची परवानगी स्थानिक प्राधिकरण कडुन घेईल.
४. अर्जदाराने जमीनीच प्रत्यक्ष अकृषित वापर केल्याबाबत अहवाल एक वर्षाचे आत मा. उपअधिक्षक भुमीअभिलेख यांना कळवावा. अन्यथा अर्जदार उक्त नियमाच्या कलम ६ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहिल. अकृषिक आकारणीत शासनाकडुन वेळोवेळी येणाऱ्या आदेशाप्रमाणे बदल अर्जदारांना बंधनकारक राहिल.
५. मंजुर झालेले बांधकाम दुरुस्ती कोणतीही वाढ नगर परिषद/नगर रचना जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय करणार नाही.
६. संदर्भाधीन जागेत काही वृक्ष असल्यास भुखंडावर बांधकाम करतांना ने नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावे.
७. वरील पैकी कोणतेही अटिंचे अथवा शर्तीचे उल्लंघन झाल्यास उक्त बाबतीत जे नियम अस्तीत्वात असतील त्या प्रमाणे जिल्हाधिकारी जो दंड अथवा आदेश देतील ते आयोजकास पालन करण्यास बंधनकारक राहिल.
८. जे बांधकाम नियम बाह्य असले ते बांधकाम पाडण्याचे समक्ष अधिकारी यांचे आदेश आवेदकास बंधनकारक राहिल व अनाधिकृत बांधकाम अर्जदाराने स्वत: खर्चाने न पाडल्यास ते शासकीय यंत्रणे मार्फत पाडण्यात येईल व त्यावर येणारा खर्च शासकीय थकीत म्हणून वसुल करण्यात येईल.
९. शासनाचे परिपत्रक क्रमांक सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १७ महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश दि. २३ ऑगस्ट २०१४ प्रमाणे चे आदेश अधिन राहुन हि परवानगी देण्यात येत आहे. व या आदेशानुसार मुख्याधिकारी यांना आलेली अधिकार नुसार नगर परिषद हद्दीतील शेत

सर्व्हे नं. चे नगर रचना यांच्याकडुन अहवाल घेणे हे बंधनकारक नाही करीता निवासी प्रयोजन मधून मंजुरी देण्यात येत आहे.

१०. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत योग्य ते विकास शुल्क भरुन नगर पालिकेचे पुर्व परवानगी घेतल्याशिवाय या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

११. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रे मोजणी नकाशा व जागेच्या मालकी हक्काबाबत उद्‌भवल्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहिल.

१२. आवेदकाने वर नमुद केलेल्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे.

१३. वरील पैकी कोणतेही अट आवेदकास मान्य नसल्यास मौजे येरला ता. मोर्शी जि. अमरावती येथील सर्व्हे नं. १७३/२ब सर्व्हे मधील क्षेत्रफळ १.२३ हे.आर. जमीन निवासी प्रयोजनार्थ अकृषक करण्याची परवानगी बाबतचा हा आदेश रद्द समजण्यात येईल.

नगर पालिका कार्यालय नपाम. मोर्शी.

मुख्याधिकारी,
नगर परिषद मोर्शी

प्रतिलीपी :-

१. मा. उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय मोर्शी.

२. मा. सहाय्यक संचालक नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग अमरावती.

३. तलाठी, मौजा येरला ता. मोर्शी

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना. संबंधीतांनी संबंधीत जमीनीचे अभिलेखामध्ये आवश्यक ते नोंदणी तात्काळ घ्याव्यात व तसा अहवाल माझे कार्यालयास ७ दिवसाच्या आत सादर करावा.

मुख्याधिकारी,
नगर परिषद मोर्शी

नगर पालिका कार्यालय नपाम. मोर्शी.